# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

**मुख्य कार्यालय**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎२२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१
Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎23742191 Fax : 23781061
ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in


## पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा २०१३

## अधिसूचना क्रमांक : १४४२(२)(२)/२०१३/ तीन

जाहिरात क्रमांक -२०/२०१३, दिनांक १६ जुलै, २०१३ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील ७१४ पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. २५ ऑगस्ट, २०१३ रोजी घेण्यात आलेल्या **पोलीस उपनिरीक्षक (पूर्व )परीक्षा-२०१३** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१३** रविवार **दिनांक ८ डिसेंबर, २०१३** रोजी **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या केंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तुत मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांनी पूर्व परीक्षेकरिता देण्यात आलेल्या माहितीच्या आधारेच मुख्य परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | एकूण पदे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| **१** | **पोलीस उप निरीक्षक** (एकूण ७१४ पदे) | २८१ | ५३ | ४२ + ८* | २१ + १३* | २० + १* | १६ +१३* | २० +१८* | ०९ | १०० +९९* | ७१४ |
| | महिला - | ८४ | १६ | १५ | १० | ६ | ८ | ११ | ३ | ६० | २१३ |
| | खेळाडू - | १४ | ३ | ३ | २ | १ | १ | २ | -- | १० | ३६ |

**टीप :-**

**२.१** * अशी खुण केलेली पदे अनुशेषाची आहेत.

**२.२** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**२.३** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.४** उपरोक्त भरतीकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित ) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू आहे.

**२.५** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.६** खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल. **मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे, संचालक, क्रिडा व युवक संचालनालय यांच्याकडून प्रमाणित करुन ठेवावीत.**

**३.** सदर परीक्षा खालील तीन टप्प्यांत घेण्यात येईल

**(१) लेखी परीक्षा :-** एकूण (१०० + १००= २००) गुण. **(२) शारीरिक चाचणी** :- १०० गुण. **(३) मुलाखत :-** ४० गुण

३.१ पुरुष व महिला उमेदवारांकरीता उंची तसेच फक्त पुरुष उमेदवारांच्या बाबतीत छातीची मोजमापे ही आवश्यक अट असल्यामुळे या मोजमापांची तपासणी त्यांच्या शारीरिक चाचणीपूर्वी घेण्यात येईल. विहित उंची व छाती विषयक मोजमापाच्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात येईल.

३.२. **वयोमर्यादा :- १ नोव्हेंबर, २०१३** रोजी किमान **१९ वर्षे** असावे व **२८ वर्षापेक्षा** जास्त नसावे.

३.३ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-**

**३.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता **३ वर्षांपर्यंत** शिथिलक्षम राहील.

**३.३.२** पात्र खेळाडूंच्या बाबतीत **५ वर्षांपर्यंत.**

३.३.३ पोलीस उपनिरीक्षक हे पद अराजपत्रित गट-ब दर्जाचे आहे. माजी सैनिकांचे १५% आरक्षण हे गट-क व गट-ड दर्जाच्या पदाकरिता लागू आहे. त्यामुळे शासनाने सदर पदांसाठी माजी सैनिकांसाठीचे आरक्षण विहित केलेले नाही. माजी सैनिकांच्या आरक्षणासंदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे.

**३.३.४** माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहिल.

**३.३.५** आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.

३.४ **शैक्षणिक अर्हता :-**

**३.४.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**३.४.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.४.३** जे उमेदवार पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसले आहेत असे उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१३ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०१३ परीक्षेची अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**३.४.४** ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

४. **शुल्क** :   ४.१ :- अमागास - रु. ३१५/- ४.२ :- मागासवर्गीय - रु. १६५/- ४.३:- माजी सैनिक – १५/-

५. **अर्ज करण्याची पद्धत** :-

**५.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**५.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज **www.mahaonline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३ ते दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहिल.

**५.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या **www.mpsconline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**५.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**५.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**५.६** www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे

**५.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(**१**) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) **"माझे खाते "** " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर " ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी " '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(**३**) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(**५**) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(**७**) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**५.८** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

६. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

७. प्रस्तुत अधिसूचनेमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची पध्दत आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत उमेदवारांना सर्वसाधारण सूचना तसेच परीक्षा विभागातील पोलीस उपनिरीक्षक परीक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली पोलीस उपनिरीक्षक परीक्षेबाबतची माहिती अधिकृत समजण्यात येईल.

८. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २२ नोव्हेंबर, २०१३ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

९. चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २३ नोव्हेंबर, २०१३** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

१०. पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपल्ब्ध आहे.

**मुंबई**
**दिनांक : १२ नोव्हेंबर, २०१३.**

**प्र. मा. आचरेकर**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**